Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# जालना जिल्ह्यातील धनगर समाजाची धार्मिक स्थिती: एक दृष्टिक्षेप

**म्हस्के कडूबा भिमराव**
संशोधक विद्यार्थी

**डॉ. कालिदास सुर्यवंशी**
इतिहास विभागप्रमुख,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,
जालना

**प्रस्तावना :**

प्रत्येक संस्कृतीची विशिष्ट रचना असते. त्यांच्यात सामाजिक संस्था एकमेकात गुरफटलेल्या असतात. त्या एकमेकांवर अवलंबून असतात. भिन्न संस्कृती परस्परांच्या सानिध्यात आल्यावर प्रथम संघर्ष होतो व पुढे देव देव करू लागतात. यातून नवे स्वरूप उदयाला येते. मानव म्हणून सर्वांच्यामध्ये बऱ्याच बाबतीत सारखेपणा दिसत असला तरी अनेक गोष्टी वेगवेगळ्या असतात. यास जालना जिल्ह्यातील धनगर समाज अपवाद नाही. कोणत्याही संस्कृतीचा विकास म्हणजे तिच्या घटक संस्थांच्या ध्येयाचा व पद्धतीचा विकास होय. त्याच पद्धतीने धनगर समाजाचा विकास होत गेला.[१]

धनगर समाजाच्या कलागुणांचा विचार करताना या समाजाने स्वतः उपेक्षित जीवन जगून संस्कृती जिवंत ठेवण्याचे काम केले. या समाजाने भारतीय संस्कृतीसाठी स्वतःचे महत्त्वपूर्ण असे योगदान दिले. धनगर समाजातील देवी-देवता, ग्रामदेवता, कुलदेवता यावरून समाजाची स्थिती लक्षात येते. धनगर समाजात सण, उत्सव यातून समाजाच्या धर्म संस्कृतीचा अंदाज येतो. धनगर समाजात श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातून धार्मिक बाबींचे दर्शन आपणास होते. हा समाज कोणत्या श्रद्धा व अंधश्रद्धा बाळगतो यावरून या समाजाची संस्कृती व त्या संस्कृतीचा आधार आपल्या लक्षात येईल. मानवी समाजातील सर्व रुढी, प्रथा, परंपरा, चालीरीती यांना उद्देशून संस्कृती हा शब्दप्रयोग केला जातो.[२]

समाजाचा घटक या दृष्टीने मानवाने संपादन केलेले ज्ञान, नितीमत्ता, कायदा, रितीरिवाज, कार्यशक्ती, सवयी या सर्वांचे गुंतागुंतीचे संकलन म्हणजे संस्कृती होय. धनगर समाजाची नाळ

भारतीय संस्कृतीशी जोडली गेलेली आहे. हा समाज सांस्कृतिक दृष्ट्या भारतीय विकासात स्वतःचे योगदान देतो. धनगर समाजाची सांस्कृतिक परिस्थिती समाजातील कलाविषयक बाबींशी निगडित आहे. या समाजाचे राहणीमान हिंदू धर्माच्या नियमाप्रमाणे आहे. त्याचा पोशाख, बोलीभाषा व कला कौशल्य या सर्व बाबींवरून धनगर समाजाची सांस्कृतिक परिस्थिती लक्षात येते.[३]

धनगर समाज हा स्वतःच्या रुढी, प्रथा व परंपरांचे पालन करतो. या समाजाला पारंपारिक पद्धत म्हणजेच स्वतःचे आद्य कर्तव्य म्हणून जपत असल्याच्या आढळते. जुन्या प्रथांचा अंगीकार, जुन्या रुढीचे पालन, हा स्वतःची परंपरा म्हणून पाळत असतो. रुढी किंवा प्रथा ही संकल्पना व्यापक असून त्यात अनेक लोकांच्या परंपरा व संकेत, सण, उत्सव, रितीरिवाज यांचा समावेश होतो. धनगर समाजात अंधश्रद्धेतून बऱ्याच परंपरा पाळल्या जातात. धर्मामुळे समाज जीवनाच्या दृष्टीने मानवी जीवनाला एक आकार प्राप्त झाला.[४] यासंदर्भात दुर्गाबाई भागवत म्हणतात, शुभाशुभ, पापपुण्य, योग्य-अयोग्य वगैरे गोष्टी नोंदविलेल्या असतात. धर्मात समाजात हितकारक रूढी, समजूतीचा भरणा असतो.

समाजाला अनिष्ट समजल्या जाणाऱ्या मार्गाकडे प्रवृत्त करणाऱ्या रूढी, समजुती किंवा हिताला बाधक असणाऱ्या बाबींचा समावेश धर्मात दिसत असला म्हणून धर्म वाईट आहे किंवा कालबाह्य झाला आहे असे म्हणता येत नाही. कारण काळानुसार त्यातील तत्त्वांमध्ये बदल होतो. धर्मामुळेच मानवी इतिहास निर्माण झालेला दिसतो. समाजाच्या स्थिती गतीचा व धर्म रुढीचा अनन्य संबंध असतो. म्हणून धर्मामुळे समाजाचा, स्थितीगतीचा सामाजिक परिवर्तनाचा शोध घेता येतो.

धर्माची लिखित संहिता नसल्यामुळे धर्मात अनेक बऱ्यावाईट रुढी, समजूती निर्माण झाल्या. या रूढी, परंपरा, समजुती त्या त्या काळात समाजहित साधणाऱ्या असतात असे जाणवते. धर्मात वाईट कृत्याला मान्यता नाही. वाईट कृत्य करणे म्हणजे पापाचे धनी होऊन नरकात पडणे, असे सांगून दूर्ववर्तनाला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला जातो किंवा समाज विरोधी वर्तने करू नये, म्हणून पुनर्जन्माची भीती दाखवणे वगैरे गोष्टी धर्मात आलेल्या दिसतात. समाजात विविध विचार, उद्‌बबोधक वाक्य, म्हणी, वाक्यप्रचार, विविध संकेत अस्तित्वात येतात.[५]

धनगर समाजातील अध्यात्मिक मुल्य आजही जोपासल्या जात असल्याचे दिसते. या मूल्यातून समाजात संरक्षणाच्या दृष्टीने परंपरेचे पालन आणि तिचे संवर्धन होते. या समाजात लहान मोठ्या विधीतून अनेक परंपरांचा समावेश होतो. हा धनगर समाज नानाविध परंपरांनी नटलेला आहे. या समाजातील विविध व्यक्तीस परंपरा सोडून गेल्यास त्या व्यक्तीस परंपरेप्रमाणे बहिष्कृत केले जात असे.[६] या समाजात धार्मिक बाबतीत अनेक परंपरा प्रचलित आहेत. कोणत्याही समाजातील वर्षानुवर्षे चालत आलेल्या, पिढ्याने पिढ्या आलेल्या रुढी, कायदा, प्रथा, आचार-विचार, विधी-निषेध, मुल्ये, पुराणकथा व दंतकथा, लोकरीती इत्यादींचा संग्रह म्हणजे परंपरा होय,

धनगर समाजातील परंपरेचे महत्व लक्षात घेता या समाजातील व्यक्तींच्या जन्मापासून ती मृत्यूपर्यंत त्या व्यक्तींवर परंपरेचा प्रभाव दिसून येतो. म्हणजे जन्मानंतर ती व्यक्ती मरेपर्यंत परंपरेनुसार वर्तन करते. या समाजातील शेवटचा विधी म्हणजे अंत्यविधी. हा विधी परंपरेप्रमाणेच केला जातो. धनगर समाजात मृत्यू नंतर प्रेताला गरम पाण्याने अंघोळ घालणे, नवे कपडे नेसवणे, ताटी बांधणे, त्याच्या प्रताजवळ पानं, गुलाल, भंडारा याची उधळण केली जाते. त्याच्यात दफन करण्याची प्रवृत्ती आढळते. त्यानंतर विविध विधी इतर समाजाप्रमाणे केले जातात.[७]

बिरोबा आणि खंडोबा या देवतांबाबत अनेक कथा, लोककथा अस्तित्वात असलेल्या दिसतात. विशेषता खंडोबाच्या बाबतीत तर केवळ लोककथाच नाही तर अनेक लोकगीतेही निर्माण झालेली आहे. तसेच गाणीही अस्तित्वात असल्याचे जाणवते. खंडोबा हा शूरवीर असल्याचे स्पष्ट होते. तसेच त्याला क्षेत्र पाळदेव मानले जाते. म्हाळसा ही खंडोबाची पहिली पत्नी होती. ती ही कर्नाटकातील एक लोक देवी होती. खंडोबाची दुसरी पत्नी बाणाई होय. ती धनगर कन्या होय. या बाणाईच्या संदर्भात अनेक लोककथा आणि लोकगीते सापडतात. अशा अनेक लोककथातून त्यांच्या विवाहाचे, प्रेमाचे, विविध घटनांचे वर्णन केल्याच्या आढळते. बाणाई ही अतिसुंदर असल्यामुळे खंडोबाने तिला घोड्यावर टाकून पळवून नेल्याच्या कथेची तितक्याच उत्स्फूर्तपणे सांगितल्या जातात. या सर्व कथांमधून असे सिद्ध होते की, बाणाई खंडोबाची दुसरी पत्नी होती. म्हाळसा आणि बाणाई यांच्यात सवती मत्सर होता, असे सूचित होते.[८]

बिरोबा हे काही धनगर लोकांचे कुलदैवत आहे. सर्व धनगर लोक बिरोबाला श्रद्धेय भूमिकेतून पाहतात. बिरोबाला गावाजवळ प्रतिकात्मक रुपात वसविलेला असतो. मेंढ्या कातरल्यानंतर धनगर लोकर कापनाऱ्याना जेवण घालततातआपल्या मेंढ्यांना कोणतीही इजा नये म्हणून ते मेंढ्या मिरवतात.[९] सटीच्या दिवशी बिरोबाच्या मंदिराजवळ बकऱ्यांचा बळी दिला जातो. धनगर लोकात प्रत्येक भगवंताच्या घरी धनगराची काठी असते. सटीच्या दिवशी तिची पूजा करतात व ती गाजत वाजत बिरोबा मंदिराजवळ आणून तिची बेल भंडाऱ्याने पूजा करतात.

बिरदेवाचे मंदिर श्री क्षेत्र फलटण जि. सातारा, श्री बिरदेव मंदिर क्षेत्र पांगरी ता. माण, जि. सातारा, श्री बिरोबा मंदिर कोलारा ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर, श्री विठ्ठल बिरदेव मंदिर, श्री क्षेत्र कराड, एसटी स्टँड समोर कराड, जि. सातारा, श्री विठ्ठल बिरदेव क्षेत्र पट्टणकोडोली, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, श्री बिरदेव क्षेत्र, घोडगिरी, ता. हुक्केरी, जि. बेळगाव, श्री बिरदेव तपश्चर्या स्थान, मु. गोडगिरी, ता. हुक्केरी, जि. बेळगाव या ठिकाणी बिरदेवांची मंदिरे आहेत.[१०]

बिरोबाला धनगर आपले कुलदैवत मानतात. बिरोबा हे महाराष्ट्राच्या दृष्टीने उग्र दैवत असले तरी ते धनगरांचे कुलदैवत आहे. गावोगावी बिरोबांची ठाणे वसलेली आहेत. सांगली जिल्ह्यातील आरेवाडी या गावांच्या शिवारात बिरोबाचे मुख्य ठाणे आहे. आरेवाडी ता. कवठेमहाकाळ जि. सांगली येथील श्री बिरदेवाच्या मंदिरात भस्माचा वापर करतात. मात्र श्री बिरदेवाच्या इतर सर्व मंदिरात भंडाऱ्यांचा वापर करतात.[११]

आजही खेलु भक्तांच्या वंशाजातर्फे पट्टणकोडोली ता. हातकणंगले जि. कोल्हापूर या ठिकाणची श्री विठ्ठल बिरदेवाची यात्रा अश्विन मासात ज्यादिवशी मृग नक्षत्र असते त्या दिवशी साजरी केली जाते. मोठ्या भक्तीभावाने काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंतच्या धनगर समाज तसेच इतर जाती-जमातीचे लोकही पट्टणकोडोली येथे जाऊन यात्रा साजरी करतात. आजही श्री बिरदेवाच्या नावाचा भंडारा कपाळी धारण केला तरी आजही मनोकामना पूर्ण होते अशी भक्तांची श्रद्धा आहे. बिरोबा या नावाने नावारूपाला आलेला बिरोबा आज धनगरांचा कुलदेव बनला आहे. गावोगावी बिरोबाची ठाणे वसलेली आहे. बिरोबा हा धनगरांचा सकामदेव आहे. बिरोबा सकाम कुलदैवत असल्यामुळे धनगरांच्या धार्मिक जीवनात बिरोबाकडे दुर्लक्ष करून भागत नाही.[१२]

**संदर्भ सूची :**

१. पाटील वसंत निवृत्तीराव, (२०१२), धनगरी बोली, प्रथमावृत्ती, धुळे : अथर्व पब्लिकेशन, पृ.क्र. ५६.

२. भागवत दुर्गाबाई, (१९७५), धर्म आणि लोकसाहित्य, द्वितीय आवृत्ती, मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, पृ.क्र. १

३. जोशी महादेव शास्त्री, भारतीय संस्कृती कोश, खंड २, प्रथमावृत्ती, पृ.क्र. ३२२

४. जोशी बी. आर. (२००७), डायमंड व सामाजिक ज्ञानकोश, खंड १, प्रथम आवृत्ती पुणे : डायमंड पब्लिकेशन, पृ.क्र. ५६१

५. जोशी बी. आर. (२००७), डायमंड व सामाजिक ज्ञानकोश, खंड ३, प्रथम आवृत्ती पुणे : डायमंड पब्लिकेशन, पृ.क्र. २२८

६. कोळेकर ग. बा. साप्ताहिक अहिल्या संदेश, गिरे ल.बा. प्रकाशित, सोलापूर. पृ.क्र.२

७. बडे बी. बी. (१९८९), धनगरांच्या देवता, धुळोबा, भिवाया, प्रथमावृत्ती, औरंगाबाद : सविता प्रकाशन, पृ.क्र. १२

८. जोशी बि. आर, (२००७), डायमंड व सामाजिक ज्ञानकोश, खंड ११, प्रथमावृत्ती, पुणे : डायमंड पब्लिकेशन, पृ.क्र. ५६७

९. बळे बी. बी. (१९८९), धनगरांच्या देवता, धुळोबा, भिवाया, प्रथमावृत्ती, औरंगाबाद : सविता प्रकाशन, पृ.क्र. २९

१०. भुजाडे होमेश, (२००५), धनगर समाज आणि परिवर्तन, द्वितीय आवृत्ती, वर्धा : विलास पुनसे, पृ.क्र. २९

११. पाटील वसंत निवृत्तीराव, (२०१२), धनगरी बोली, प्रथमावृत्ती, धुळे : अथर्व पब्लिकेशन, पृ.क्र. ५८.

१२. जोशी महादेव शास्त्री, भारतीय संस्कृती कोश, खंड ६, प्रथमावृत्ती, पृ.क्र. १६१.